## प्रेसनोट - दिनांक १८/१२/२०२४

डॉ. माधव विष्णुपंत जोशी, वय-४८ वर्षे, पद-जिल्हा समन्वयक, महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना, रा. १०३, व्दारका पॅराडाईस, मोहिते नगर, होटगी रोड, सोलापूर, यांचे विरोधात तक्रारदार यांचेकडून २,००,००० /- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती १,००,०००/- रुपये मागणी करुन, ती स्वतः स्विकारले वरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | सोलापूर युनिट, पुणे परिक्षेत्र. |
| गुन्हा नोंद क्रमांक | सदर बझार पोलीस ठाणे, सोलापूर शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा कलम ७, प्रमाणे. |
| आरोपीचे नांव व कार्यालय | डॉ. माधव विष्णुपंत जोशी, वय-४८ वर्षे, पद-जिल्हा समन्वयक, महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना, जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, गुरुनानक चौक, सोलापूर. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २,००,००० /- रुपये |
| तडजोडीअंती स्विकारलेली लाच रक्कम | १,००,००० /- रुपये (पहिला हफ्ता म्हणुन) |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचे लॅबला श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर येथे कार्यान्वित असलेल्या महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत दाखल होणाऱ्या रुग्णांचे रक्त व लघवीचे नमुने तपासुन रिपोर्ट सादर करण्याचे काम निविदेद्वारे मिळालेले होते. तक्रारदार यांचे लॅबच्या विरोधात आलेल्या तक्रारी अर्ज हा पुढील चौकशीकामी डॉ. माधव जोशी यांचेकडे होता. सदर तक्रारी अर्जाचे अनुषंगाने डॉ. माधव जोशी यांनी तक्रारदार यांना संपर्क साधुन त्यांचे लॅबचे कामाबाबत माझ्याकडे तक्रार प्राप्त झाल्याचे सांगुन, तुमच्या बाजुने अहवाल वरिष्ठांना पाठवितो असे सांगुन तसेच लॅबविरुध्द रिपोर्ट पाठविल्यास महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत केलेल्या कामाचे उर्वरीत बिल निघणार नाही अशी भिती दाखवुन, त्याकरीता २,००,०००/- रु. लाचेची मागणी केली. त्यानंतर आरोपी डॉ. माधव जोशी यांनी पहिला हफ्ता म्हणुन तडजोडीअंती १,००,०००/- रु. लाच मागणी केल्याचे दिनांक १७/१२/२०२४ रोजी पडताळणी कारवाईमध्ये निष्पन्न झाले असुन, दिनांक १८/१२/२०२४ रोजी सापळा कारवाईमध्ये पहिला हफ्ता म्हणुन १,००,०००/- रु. लाच रक्कम स्वतः स्विकारलेली आहे. |
| मार्गदर्शन अधिकारी | श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक लाप्रवि, पुणे.<br>डॉ. शीतल जानवे/खराडे, अपर पोलीस अधीक्षक,लाप्रवि, पुणे. |
| सापळा पथक | श्री. गणेश कुंभार, पोलीस उपअधीक्षक, पोह/ श्रीराम घुगे, पोशि/ राजु पवार, पोशि/सचिन राठोड, चापोशि/शाम सुरवसे, सर्व नेमणुक - अॅन्टी करप्शन ब्युरो सोलापूर यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागा तर्फे सोलापूर जिल्हयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल अथवा त्याच्यावतीने लाच मागणा-या खाजगी व्यक्तींबद्दल तक्रार असल्यास त्वरीत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे टोल फ्री क्रमांक १०६४ अगर दुरध्वनी क्रमांक ०२१७-२३१२६६८ वर संपर्क साधावा.

**संपर्क पत्ता**- पोलीस उपअधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, श्री छत्रपती शिवाजी रंगभवन चौक सोलापूर.

**संकेतस्थळ** - www.acbmaharashtra.gov.in

**ई मेल** - www.acbwebmail@mahapolice.gov.in

**ऑनलाईन तक्रार अॅप** – acbmaharashtra.net

संपर्क टोल फ्री क्रमांक :- १०६४

दुरध्वनी क्रमांक :- ०२१७-२३१२६६८

व्हॉटस अॅप क्रमांक :- ९९३०९९७७००

सहा.पो.आयुक्त/पोलीस उप अधीक्षक * अॅन्टी करप्शन ब्युरो,सोलापूर * सत्यमेव जयते

(गणेश कुंभार)
पोलीस उपअधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,सोलापूर

Scanned with CamS